# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**महत्वाचे**

क्रमांक: २अ/एडीएम/२०१८/११८
दिनांक : 31 JAN 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

**विषय** :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती विहीत वेळेत सादर न केलेल्या महाविद्यालयांनी माहिती ऑनलाईन सादर करण्याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या सूचना

संदर्भ : प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण १६१७/ प्र.क्र.२२९/प्रनिप्रा , दिनांक २५.१.२०१८

वरील विषयाबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाचे संदर्भाधीन पत्र सोबत जोडण्यात येत आहे. पत्रातील सूचनांनुसार ज्या विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रक्रिया शुल्कासह सादर केलेली नाही अशा महाविद्यालयांनी दिनांक २९.१.२०१८ ते १२.२.२०१८ पर्यंत प्रक्रियाशुल्क +२० टक्के विलंब शुल्क भरून www.sspnsamiti.gov.in आणि www.pnsamiti.com या संकेतस्थळावर सादर करण्याचे कळविले आहे.

तसेच ज्या विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांनी संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांकडून पडताळणी केलेल्या प्रवेश यादया प्राधिकरणाने विहीत केलेल्या प्रपत्रात सादर केलेल्या नाहीत अशा संस्थांनी उपरोक्त कालावधीत प्राधिकरण कार्यालयात निश्चितपणे सादर करण्यास संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे.

संदर्भाधीन पत्र आणि वरील सुचना आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांच्या निदर्शनास आणून या संस्थांमधील प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव विहीत केलेल्या प्रपत्रात प्रमाणित करून प्राधिकरणाकडे विहीत वेळेत सादर करण्यात येतील याची दक्षता घेण्याबाबतही सर्व संस्थांना सूचित करण्यात यावे.

**वरील वेळापत्रकानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन तसेच प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव ऑफलाईन सादर न केल्यामुळे संबंधित प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमित न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाप्रमुखांची राहील ही बाब सर्व विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावी.**

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित

E:\Budage\२०१७-१८\Merit List\ARA notice for submission of merit lists.docx

पत्र प्राप्त झाले

30 JAN 2018


महाराष्ट्र शासन

**प्रवेश नियामक प्राधिकरण**

३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी,
अली यावर जंग मार्ग, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१

दूरध्वनी : ०२२ - २६४७ ६०३७
फॅक्स : ०२२ - २६४७ ६०३७

वेबसाईट : sspnsamiti.gov.in
ईमेल : sspnsamiti@yahoo.com


क्र. संकिर्ण-१६१७/प्र.क्र.२२९/प्रनिप्रा

दिनांक: २५ जानेवारी २०१८

प्रति,
प्राचार्य/अधिष्ठाता,
विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
महाराष्ट्र राज्य

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती विहीत वेळेत सादर न केलेल्या महाविद्यालयांनी सदर माहिती ऑनलाईन सादर करणेबाबत...

संदर्भ:
१. या कार्यालयाचे समक्रमांकाचे दि. ३/११/२०१७ चे पत्र
२. या कार्यालयाचे समक्रमांकाचे दि. २८/११/२०१७ चे पत्र
३. या कार्यालयाचे समक्रमांकाचे दि. ६/१२/२०१७ चे पत्र
४. या कार्यालयाचे समक्रमांकाचे दि. १२/१२/२०१७ चे पत्र
५. प्रवेश नियामक प्राधिकरणाचा दि. २४/०१/२०१८ रोजीच्या बैठकितील निर्णय.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव संबंधित संचालकांकडून प्रमाणित करुन विहित वेळेत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करणे बंधनकारक आहे.

२. संदर्भाधीन पत्राने प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर सादर करण्याबाबतचे वेळापत्रक सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आले होते, तथापि काही महाविद्यालयांनी अद्याप प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती, संकेतस्थळावर प्रक्रिया शुल्कासहित, सादर केलेली नाही. अशा महाविद्यालयांनी दि.२९/०१/२०१८ ते दि.१२/०२/२०१८ पर्यंत प्रक्रियाशुल्क + २० टक्के विलंब शुल्कासहित त्यांच्या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधिल पदव्युत्तर/पदवी/पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या www.sspnsamiti.gov.in व www.pnsamiti.com या संकेतस्थळावर सादर करावयाची आहे.

३. ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव संबंधीत संचालकांकडून प्रमाणित करुन प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी विहीत केलेल्या प्रपत्रात सादर केलेली नाहीत, अशा महाविद्यालयांनी दि.२९/०१/२०१८ ते दि.१२/०२/२०१८ या कालावधीत प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयात निश्चितपणे सादर करावेत.

Desk. 2

उ. प्रमाणे त्वरित कार्यवाही करावी

30/1

८६३
30/1/18

४. वरील वेळापत्रकानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन तसेच, प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव ऑफलाईन सादर न केल्यामुळे संबंधीत प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमित न झाल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

सहपत्रे :- वरिलप्रमाणे

(अशोक चौधरी)
कक्ष अधिकारी,
प्रवेश नियामक प्राधिकरण

प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित, -

१. सर्व संचालक, वैद्यकिय शिक्षण/उच्चशिक्षण/तंत्रशिक्षण/कलाशिक्षण/आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्याशी निगडीत महाविद्यालयांचे प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव विहीत केलेल्या प्रपत्रात प्रमाणित करुन प्राधिकरणाकडे विहीत वेळेत संबंधीत महाविद्यालयांकडून सादर करण्यात येतील याची दक्षता घ्यावी.

२. मे.विधुमंगल टेक्नोलॉजी प्रा.लि. पुणे यांनी वरील कालावधीसाठी प्रक्रिया शुल्क + २० टक्के विलंब शुल्क आकारण्याबाबत ऑनलाईन सिस्टिममध्ये योग्य ते बदल करुन उचित कार्यवाही करावी.

३. निवड नस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण.